**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम**
आर्थिक वर्ष २००७-०८ साठी देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान देण्यासाठी पाणी पट्टीची अट शिथिल करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक ग्रापापु १००७/प्रक्र २३३/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक १० डिसेंबर, २००७**

**वाचा :-** शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि. क्रमांक ग्रापापु १००३/प्र.क्र.२५६/पापु-०७, दिनांक १० जुलै, २००६

**प्रस्तावना :**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत नैसर्गिक परिस्थितीमुळे दूरवरुन पाणी आणावे लागल्याने होणाऱ्या देखभाल दुरुस्ती खर्चाची काही प्रमाणात प्रतिपूर्ती करण्यासाठी गरजू ग्राम पंचायतींना व जिल्हा परिषदांना **देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान** देण्याबाबतचा निर्णय संदर्भिय शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आला असून, या शासन निर्णया सोबत जोडण्यात आलेल्या **परिशिष्ट- १** व **परिशिष्ट- ३** मध्ये अनुक्रमे स्वतंत्र व प्रादेशिक योजनेस हे देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान प्राप्त होण्यासाठीची पात्रता व त्यांनी पूर्ण करावयाच्या अटी देण्यात आल्या आहेत. त्यामधील अटीनुसार हे अनुदान मागणी करताना लगतच्या वर्षात स्वतंत्र व प्रादेशिक योजनासाठी आकारण्यात आलेल्या एकूण पाणीपट्टीच्या रकमेपैकी किमान ५०% वसूली होणे आवश्यक आहे.

२. या संदर्भात सर्व जिल्हयांकडून माहिती मागवीली असता असे निदर्शनास आले आहे की, स्वतंत्र व प्रादेशिक योजनांसाठी प्रोत्साहन अनुदानाची मागणी करताना लगतच्या वर्षात आकारण्यात आलेल्या एकूण पाणीपट्टीच्या रकमेपैकी ५०% एवढी वसूली झालेली नसल्याने बहुतांश योजना देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान मिळण्यासाठी पात्र ठरत नाहीत. म्हणून जिल्हा परिषदांनी तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने चालू आर्थिक वर्षाकरीता पाणीपट्टी वसूलीची ५०% ची घालण्यात आलेली अट काही प्रमाणात शिथिल करण्याची विनंती केली आहे. या विनंतीचा विचार करून ही अट चालू आर्थिक वर्षासाठी शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करून संदर्भिय शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत नैसर्गिक परिस्थितीमुळे दूरवरुन पाणी आणावे लागल्याने होणाऱ्या देखभाल दुरुस्ती खर्चाची काही प्रमाणात प्रतिपूर्ती करण्यासाठी गरजू ग्राम पंचायती जिल्हा परिषदा व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान देण्यासाठी संदर्भिय शासन निर्णया सोबत जोडण्यात आलेल्या **परिशिष्ट- १ व ३** नुसार स्वतंत्र व प्रादेशिक योजनांना हे देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान प्राप्त होण्यासाठीची पात्रता व पूर्ण करावयाच्या अटी देण्यात आल्या आहेत. या अटींमधील आकारण्यात आलेल्या पाणीपट्टीची लगतच्या वर्षाची वसूली ५०% असावी अशी घातलेली अट **फक्त चालू आर्थिक वर्षाकरीता (म्हणजे सन २००७-०८ करीता) देय**

**असलेल्या देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदानासाठी ३०% पर्यंत शिथिल करण्यास शासन मंजूरी देत आहे.**

२. चालू आर्थिक वर्षाकरीता **(म्हणजे सन २००७-०८ करीता)** देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान प्राप्त होण्यासाठी सन २००६-०७ या आर्थिक वर्षात आकारण्यात आलेल्या पाणीपट्टीची वसूली किमान ३०% झालेली असावी. सन २००७-०८ या आर्थिक वर्षा पासून पुढे देखभाल दुरूस्ती प्रोत्साहन अनुदान प्राप्त होण्यासाठी आकारण्यात आलेल्या एकूण पाणीपट्टीच्या रकमेपैकी किमान ५०% वसूली होणे ही अट राहील.

२. त्यामुळे, वरील सुधारित निकषानुसार सन २००७-०८ या आर्थिक वर्षासाठी देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान प्राप्त होण्यासाठी पात्र असलेल्या जिल्हयातील सर्व योजनांचे अनुदान मागणीचे प्रस्ताव शासन पत्र क्र.ग्रापापु-१००७/ प्र.क्र.१३९/पापु-०७,दि.१९ जुलै,२००७ अन्वये विहित विवरण पत्र १ व ३ मध्ये भरून या विभागाकडे **तात्काळ** पाठविण्याची व्यवस्था करावी. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने त्यांचे प्रस्ताव वरीलप्रमाणे विहित विवरण पत्रात या विभागाकडे परस्पर सादर करावेत.महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून चालविण्यात येणा-या योजनांसाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध करून देण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००७१२१११३४८५५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

**( श्री.श्री.घोलप )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,
मा. मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग